**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धी पत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेचा शहरातील ध्वनी प्रदूषणावर नियंत्रणासाठी घालण्याचे प्रयत्न सुरू शहरातील नवे शांतता क्षेत्र चिन्ह फलक बसवण्यास सुरुवात करणार**

**मिरा-भाईंदर, १८ मार्च २०२५:** मिरा भाईंदर शहरातील ध्वनी प्रदुषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने शांतता क्षेत्रांची यादी अद्ययावत करण्याचे काम सुरू केले आहे. त्यानुसार शांतता क्षेत्राची पाहाणी करून, यादी निश्चित केल्यानंतर शांतता क्षेत्र चिन्ह फलक बसविण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या ३० जून २०१८ रोजीच्या राजपत्रानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने, ध्वनी प्रदूषण नियंत्रणाच्या अंमलबजावणीकरिता १०३ ठिकाणे ही 'शांतता क्षेत्र' म्हणून घोषित केले होते. तसेच त्या जागी शांतता क्षेत्रांचे चिन्ह फलक बसवले होते. मात्र गेल्या काही वर्षांत मिरा भाईंदर शहराचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे, तसेच जलद गतीने विकास कामे पुढे जात आहेत. अशावेळी शहरातील ध्वनी प्रदूषण रोखण्याच्या अंमलबजावणीला नव्याने गती देण्यासाठी, त्यानुसार ५ मार्च २०२५ पासून शांतता क्षेत्रांची यादी अद्ययावत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सर्वप्रथम महानगरपालिका शांतता क्षेत्रांची पाहाणी करत असून नव्या जागात निश्चित करत आहेत. शांतता क्षेत्रांची यादी अद्ययावत केल्यानंतर त्या ठिकाणी शांतता क्षेत्र चिन्ह फलक बसविण्यात येणार आहेत.

शांतता क्षेत्रांमध्ये शाळा, रुग्णालये, धार्मिक स्थळे आणि इतर महत्त्वाची ठिकाणांचा समावेश आहे. या ठिकाणी ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी वाहनांचे हॉर्न वाजवण्यास मनाई तसेच इतर प्रकारच्या आवाजांवरही निर्बंध असतील. महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने शांतता क्षेत्रातील ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन आणि स्थानिक संस्थांशी समन्वय साधला आहे.

ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी महानगरपालिकेचे हे प्रयत्न नागरिकांसाठी लाभदायक ठरणार आहेत. शहरातील पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी आणि नागरिकांना शांत वातावरण मिळावे, यासाठी ही उपाययोजनात्मक पावले महत्त्वाची ठरणार आहे, असे शहर अभियंता दिपक खांबित यांनी सांगितले.

Deepak Khambit
CE, MBMC